॥ सा विद्या या विमुक्तये ॥
# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade
Fax : (02462) 215572 **OFFICE OF THE DIRECTOR OF EXAMINATIONS & EVALUATION** website: srtmun.ac.in
**Phone: (02462) 215294** **E-mail: directorboee@srtmun.ac.in**

जा.क्र. परीक्षा/समन्वय/२०२४-२५/३१११ दिनांक :०९/१२/२०२४

## <u>अत्यंत तातडीचे/महत्वाचे</u>

प्रति,
मा.प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालय,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय: दिनांक १०/१२/२०२४ पासून सुरू होणा-या पदव्युत्तर** (NEP-2020, Backlog & External) **अभ्यासक्रमाचे ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश पत्र प्राप्त झालेले नाहीत अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षेबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, काही तांत्रिक अडचणीमुळे प्रस्तुत विद्यापीठाच्या हिवाळी-२०२४ पदव्युत्तर (NEP-2020, Backlog & External) अभ्यासक्रमासाठी परीक्षा आवेदनपत्र सादर करूनही ज्या विद्यार्थ्यांना परीक्षा प्रवेश पत्र (Admit Card) अद्याप प्राप्त झालेले नाहीत अशा विद्यार्थ्यांना परीक्षेपुर्वी परीक्षा प्रवेश पत्र (Admit Card) उपलब्ध करून देण्याचे परीक्षा विभागाचे शर्तीचे प्रयत्न चालु आहेत.

परंतु उपरोक्त प्रयत्नानंतरही विद्यार्थ्यांना वेळेत परीक्षा प्रवेश पत्र (Admit Card) प्राप्त झालेले नसल्यास संबंधीत विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे ओळखपत्रासह (Identity proof) नेमून दिलेल्या परीक्षा केंद्रावर उपस्थित राहण्याबाबत आपल्या स्तरावरुन कळविण्यात यावेत, व हिवाळी-२०२४ च्या परीक्षेसाठी परीक्षा आवेदनपत्र सादर केलेला कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

तसेच, नेमूण दिलेल्या परीक्षा केंद्रावर ओळखपत्रासह उपस्थित असलेल्या विद्यार्थ्याची परीक्षा घेणेबाबत सर्व परीक्षा केंद्राना परीक्षा विभागामार्फत अधिकार देण्यात आलेले आहे व विद्यापीठाच्या परीक्षेपासून कोणताही विद्यार्थी वंचित राहणार नाही या संबंधीची काळजी विद्यापीठाव्दारे घेण्यात येत आहे.

सबब, वरीलप्रमाणे माहिती आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी/परीक्षार्थ्यांना देऊन विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

प्र.संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत माहितीस्तव :**
मा.कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ

**प्रत माहितीस्तव तथा कार्यवाहीस्तव:**
**मा.केंद्रप्रमुख, सर्व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे परीक्षा केंद्र/महाविद्यालये यांना देऊन कळविण्यात येते की, प्रवेशपत्र नसतानाही जे विद्यार्थी परीक्षा केंद्रावर उपस्थित राहिल्यास संबंधीत विद्यार्थ्यांचे ओळखपत्र (College I-Card/Identity proof) तपासून परीक्षेला बसण्याची व परीक्षा देण्याकरीता व्यवस्था करावी व अशा विद्यार्थ्यांची माहिती परीक्षा विभागास कळवून सहकार्य करावे.**